२ पुण्य नगरी

बुधवार, २४ जुलै २०२४

# विवेकानंदमध्ये एमबीए, एमसीए सुरू : गावडे

**कोल्हापूर :** बदलत्या काळानुसार भविष्याची गरज ओळखून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद महाविद्यालयात या शैक्षणिक वर्षापासून ए.आय.सी.टी.ई. मान्यताप्राप्त एम.बी.ए. आणि एम.सी.ए. हे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू होत आहेत. हे दोन्ही कोर्सेस शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असून, दोन्हींची प्रवेश क्षमता ६० आहे, अशी माहिती संस्थेचे मुख्य कार्यकारी अध्यक्ष कौस्तुभ गावडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, संचालक वीरेन भिर्डी,



## विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, सवलती

दोन्ही अभ्यासक्रमांना राज्य व केंद्र शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सर्व शिष्यवृत्ती योजना लागू आहेत. याव्यतिरिक्त संस्था व्यवस्थापनातर्फे संस्थास्तरीय डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम मेरिट शिष्यवृत्ती आणि श्री स्वामी विवेकानंद शिष्यवृत्ती जाहीर केल्याची माहिती गावडे यांनी दिली. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली या योजना राबवल्या जात आहेत.

एम.बी.ए. डिपार्टमेंटचे प्रमुख प्रा. विराज जाधव आणि एम.सी.ए. विभागप्रमुख प्रा. विजय पुजारी उपस्थित होते.

गावडे म्हणाले, भविष्यामध्ये भारताला मोठ्या प्रमाणामध्ये स्किल्ड मॅनेजर्सची आणि लीडर्सची गरज भासणार आहे. याचा विचार करून हे नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करत आहोत. स्टार्टअपसाठी लागणारे पोषक वातावरण हे दोन्ही कोर्सेसमार्फत देण्याचा संस्थेचा हेतू राहील. या दोन्ही अभ्यासक्रमांचा उद्‌घाटन सोहळा ३० जुलै रोजी संस्थेच्या मुख्य इमारत येथे अभिनेते सयाजी शिंदे यांच्या उपस्थितीत व कुलगुरू दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २४ जुलै २०२४

# 'विवेकानंद'च्या चेतन पवारचे आंतरराज्य नेमबाजी स्पर्धेत यश

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील चेतन पवार याने त्रिची तामिळनाडू येथे झालेल्या आंतरराज्य नेमबाजी स्पर्धेत यश मिळवले. नेमबाजी स्पर्धेसाठी सावंतवाडी-पुणे येथे प्रत्येकी ३० दिवसांचे शिबिर झाले. शिबिरासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील एनसीसीमध्ये असणाऱ्या कॅडेट्समधून १३ कॅडेट्सची निवड तामिळनाडूतील राष्ट्रीय सराव शिबिरा करता निवड झाली होती. नेमबाजीची कोणतीही पार्श्वभूमी नसताना व नेमबाजी प्रशिक्षण ॲकॅडमीशिवाय चेतनने यश मिळविले आहे. राष्ट्रीय सराव शिबिरातून त्याची निवड राष्ट्रीय संघात महाराष्ट्र एनसीसी डायरेक्टरकडून झाली आहे. यशाबद्दल त्याचा प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कार प्रसंगी महाविद्यालयाच्या आय. क्यू. ए. सी.च्या विभाग प्रमुख डॉ. श्रुती जोशी, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा उपस्थित होते.

तरुण भारत
कोल्हापूर
www.tarunbharat.com
बुधवार दि. २४ जुलै २०२४

# विवेकानंदमध्ये एमबीए, एमसीए अभ्यासक्रम सुरू होणार

- स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून एमबीए आणि एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमांना एआयसीटीईची मान्यता आहे. संस्थेचा पदवीधर विद्यार्थी असेल तर १५ हजार रुपये प्रवेशामध्ये सुट दिली जाणार आहे. तसेच शासनाच्या शिष्यवृत्तीसह संस्थेच्या वतीनेही शिष्यवृत्ती सुरू केली आहे. बदलत्या काळानुसार कौशल्याधिष्टीत शिक्षण देऊन उद्योजक तयार करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी स्टार्टअप इन्क्युबेशन केंद्र स्थापन केले असून बाजारात चालणाऱ्या उत्कृष्ट स्टार्टअपला संस्था आर्थिक मदतही करणार आहे, अशी माहिती आयोजित पत्रकार परिषदेत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी दिली.

गावडे म्हणाले, एमबीए अंतर्गत मार्केटिंग, एचआर, बँकिंग अँड फायनान्स, ऑपरेशन्स अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट, बिझनेस ॲनॅलिटिक्स स्पेशलायझेशन्स ऑफर हे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. एमबीए व एमसीएच्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम मेरीट शिष्यवृत्ती सुरू केली आहे. त्यामध्ये प्रवेश परीक्षेमध्ये ज्यांना ८५ पर्सेंटाईल गुण मिळाले आहेत त्यांना १०० टक्के ट्युशन फी माफ केली जाणार आहे. ज्यांना ७५ ते ८४.९९ पर्सेंटाईल गुण मिळाले आहेत त्यांना ७५ टक्के ट्युशन फी माफ केली जाईल. व ज्यांना ६५ ते ७४.९९ टक्के गुण मिळाले आहेत त्यांना ५० टक्के ट्युशन फी माफ केली जाईल. श्री स्वामी विवेकानंद शिष्यवृत्ती अंतर्गत संस्थेतील पदवीधर असल्यास १५ हजार रूपये प्रतीवर्षी ट्युशन फी संस्था भरणार आहे. एमबीए व एमसीए अभ्यासक्रमासाठी ६० टक्के प्रॅक्टिकल व ४० टक्के थेअरीं असेल. त्यामुळे वर्ग सुरू झालेल्या पहिल्या दिवसापासून विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल आणि कम्युनिकेशन स्किलचे प्रशिक्षण दिले जाते. प्लेसमेंट वाढवण्यासाठी १५० कंपन्यांबरोबर सामंजस्य करार केला आहे.

गतवर्षी २५० प्लेसमेंट झाल्या आहेत. नामांकित कंपन्यांमध्ये प्लेसमेंट देण्याची हमी महाविद्यालय घेते. तसेच या अभ्यासक्रमाबरोबर क्रडीटवरील तंत्रज्ञानावर आधारीत दोन पदविकांच्या अभ्यासक्रम पूर्ण केले पाहिजेत, अशी अट घातली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे स्कील आपोआप वाढते. जेणेकरून नोकरी करण्यापेक्षा नोकरी देणारे उद्योजक बनवण्यावर जास्त भर दिला जाणार आहे. अत्याधुनिक क्लासरूम आणि लॅब उपलब्ध करून दिली आहे. तसेच अनुभवी स्टाफदेखील आहे.

या अभ्यासक्रमाचे उद्घाटन ३० जुलै रोजी अभिनेता सयाजी शिंदे यांच्या होणार आहे. तर अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के भूषवणार आहेत. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, व्यवसायिक शिक्षण समूहाचे संचालक वीरेन भिर्डी, एमबीए विभागप्रमुख प्रा. विराज जाधव, एमसीए विभागप्रमुख प्रा. विजय पुजारी आदी उपस्थित होते.

24/07/2024

24.7.24

सकाळ
कोल्हापूर, बुधवार, २४ जुलै २०२४

# 'विवेकानंद'मध्ये एमबीए, एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू

कोल्हापूर, ता. २३ : विवेकानंद महाविद्यालयात यंदापासून ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) मान्यताप्राप्त एमबीए व एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू होत आहेत, अशी माहिती स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. अभिनेते सयाजी शिंदे व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते एमबीए, एमसीए अभ्यासक्रमाचे मंगळवारी (ता. ३०) उद्‍घाटन आहे, असेही त्यांनी सांगितले.

श्री. गावडे म्हणाले, "शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित दोन्ही अभ्यासक्रम आहेत. प्रवेशक्षमता ६० आहे. डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम मेरिट शिष्यवृत्ती योजनेंतर्गत जे विद्यार्थी एमबीए, एमसीए अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतील, त्यांना त्यांच्या एमबीए, एमसीएच्या एमएएच-सीईटीत मिळवलेल्या टक्क्यांनुसार शैक्षणिक शुल्कात सवलत मिळेल. प्रवेश परीक्षेत ८५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या कालावधीत शंभर, ७५ ते ८४.९९ टक्के गुण मिळवलेल्यांना ७५, तर ६५ ते ७४.९९ टक्के गुण मिळवलेल्यांना ५० टक्के शुल्क माफ होईल. स्वामी विवेकानंद शिष्यवृत्ती योजनेंतर्गत महाविद्यालयात पदवीचे शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यानंतर शुल्कामधील पंधरा हजार रुपये प्रतिवर्ष शुल्क शैक्षणिक कालावधीसाठी माफ होईल. शिष्यवृत्तीसाठी संस्थेने २० लाखांची तरतूद केली आहे."

ते म्हणाले, "स्टार्टअपसाठीचे पोषक वातावरण दोन्ही अभ्यासक्रमांतर्फे देण्याचा हेतू राहील. एमबीए प्रोग्रामअंतर्गत मार्केटिंग, एचआर, बँकिंग अ‍ॅन्ड फायनान्स, ऑपरेशन्स अ‍ॅन्ड सप्लाय चेन मॅनेजमेंट, बिझनेस अ‍ॅनॅलिटिक्स स्पेशलायझेशन्ससारखे अभ्यासक्रम उपलब्ध करत आहे." यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, व्यावसायिक शिक्षण समूहाचे संचालक वीरेन भिर्डी, एमबीए विभागप्रमुख प्रा. विराज जाधव, एमसीए विभागप्रमुख प्रा. विजय पुजारी उपस्थित होते.

24/07/2024

24.7.24